पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.
मा.स्थायी समिती
कार्यपत्रिका क्रमांक - १११
सभावृत्तांत

दिनांक - २२/०४/२०१४ वेळ - सकाळी ११.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार दिनांक २२/४/२०१४ रोजी सकाळी ११.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा. महेशदादा किसन लांडगे - सभापती
२) मा. धराडे शकुंतला भाऊसाहेब
३) मा. ओव्हाळ रमा नितीन ऊर्फ सनी
४) मा. भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के.बापू

या शिवाय मा.तानाजी शिंदे - अति.आयुक्त, मा.झुरे - सह आयुक्त, मा.टेकाळे, मा.गावडे, मा.फुंदे, मा.दुरगुडे, मा.माछरे – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.डॉ.रॉय - आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.भदाणे – उपसंचालक (नगररचना), मा.दुधेकर, मा.चिंचवडे, मा.साळवी, मा.लडकत, मा.खाबडे, मा.इंगळे, मा.काची, मा.गलबले, मा.घोडे – कार्य.अभियंता, मा.उबाळे - प्रशासन अधिकारी (शिक्षण मंडळ), मा.कांबळे - प्र.शिक्षणाधिकारी (माध्य.), मा.साळुंके - मुख्य उद्यान अधिक्षक, मा.इंदलकर – कामगार कल्याण अधिकारी, मा.बोदडे - प्रशासन अधिकारी, मा.लावंड - कायदा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-------

मा.सभापती - सभा कामकाज उरकणेसाठी आवश्यक गणसंख्या सभागृहात उपस्थित नसल्याने मंगळवार दिनांक २९/४/२०१४ रोजी सकाळी १०.४५ पर्यत सभा तहकूब करणेत येत आहे.

( महेशदादा किसन लांडगे )
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

कार्यपत्रिका क्रमांक - १११

सभावृत्तांत

( दिनांक २२/०४/२०१४ ची तहकूब सभा )

दिनांक - २९/०४/२०१४ वेळ - सकाळी १०.४५ वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची दिनांक २२/०४/२०१४ ची तहकूब सभा मंगळवार दिनांक २९/४/२०१४ रोजी सकाळी १०.४५ वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१ मा. महेशदादा किसन लांडगे - सभापती
२ मा. लोंढे गणेश नारायण
३ मा. कदम सदगुरु महादेव
४ मा. शेंडगे आशा सुखदेव
५ मा. गायकवाड संध्या सुरदास
६ मा. भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के.बापू
७ मा. सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग
८ मा. तरस बाळासाहेब जयवंत
९ मा. विनय ऊर्फ विनायक रमेश गायकवाड
१० मा. प्रसाद शेट्टी

या शिवाय मा.टेकाळे, मा.गावडे, मा.फुंदे, मा.खांडकेकर, मा.दुरगुडे – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.कांबळे - प्र.शहर अभियंता, मा.सुरगुडे – विकास अभियंता, मा.चव्हाण - सह शहर अभियंता, मा.भोसले - मुख्यलेखापाल, मा.डॉ.अनिल रॉय - आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.डॉ.साळवे - अति.वैद्य.अधिकारी, मा.भदाणे - उपसंचालक (नगररचना), मा.दुधेकर, मा.निकम, मा.काची, मा.चव्हाण, मा.शरद जाधव, मा.चिंचवडे, मा.थोरात, मा.साळवी, मा.कुलकर्णी, मा.खाबडे, मा.दांगट, मा.बरशेट्टी, मा.गलबले, मा.घोडे, मा.केदारी, मा.कांबळे – कार्य.अभियंता, मा.उबाळे - प्रशासन अधिकारी (शिक्षण मंडळ), मा.कांबळे - प्र.शिक्षणाधिकारी (माध्य.), मा.पाटील – प्राचार्य आय.टी.आय.मोरवाडी, मा.इंदलकर – कामगार कल्याण अधिकारी, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-------

खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक : मा.शांताराम भालेकर अनुमोदक : मा.सुनिता गवळी

मंगळवार दिनांक ०६/०५/२०१४ रोजी सकाळी १०.३० वाजेपर्यंत सभा तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

मा.सभापती - मंगळवार दिनांक ०६/०५/२०१४ रोजी सकाळी १०.३० वाजेपर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

( महेशदादा किसन लांडगे )
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.

मा.स्थायी समिती

कार्यपत्रिका क्रमांक - १११

सभावृत्तांत

(दिनांक २२/०४/२०१४ व २९/०४/२०१४ ची तहकूब सभा)

दिनांक - ०६/०५/२०१४ वेळ - सकाळी १०.३० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची दिनांक २९/०४/२०१४ ची तहकूब सभा मंगळवार दिनांक ०६/०५/२०१४ रोजी सकाळी १०.३० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा. महेशदादा किसन लांडगे - सभापती
२. मा. धराडे शकुंतला भाऊसाहेब
३. मा. कदम सदगुरु महादेव
४. मा. शेंडगे आशा सुखदेव
५. मा. ओव्हाळ रमा नितीन ऊर्फ सनी
६. मा. भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के.बापू
७. मा. सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग
८. मा. विनय ऊर्फ विनायक रमेश गायकवाड
९. मा. अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे
१०. मा. प्रसाद शेट्टी

या शिवाय मा.तानाजी शिंदे - अति.आयुक्त, मा.झुरे - सह आयुक्त, मा.टेकाळे, मा.गावडे, मा.कुलकर्णी, मा.ढेरे, मा.गायकवाड, मा.फुंदे, मा.दुरगुडे, मा.माछरे – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.घाडगे - मुख्यलेखापरिक्षक, मा.कांबळे - प्र.शहर अभियंता, मा.सुरगुडे – विकास अभियंता, मा.तुपे - सह शहर अभियंता, मा.भोसले - मुख्यलेखापाल, मा.डॉ.अनिल रॉय - आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.भदाणे -उपसंचालक (नगररचना), मा.दुधेकर, मा.निकम, मा.काची, मा.चव्हाण, मा.शरद जाधव, मा.थोरात, मा.साळवी, मा.लडकत, मा.कुलकर्णी, मा.खाबडे, मा.पिरजादे, मा.दांगट, मा.बरशेट्टी, मा.गलबले, मा.घोडे, मा.केदारी, मा.कन्हेरे, मा.कांबळे, मा.भोसले – कार्य.अभियंता, मा.उबाळे - प्रशासन अधिकारी (शिक्षण मंडळ), मा.कांबळे - प्र.शिक्षणाधिकारी (माध्य.), मा.पाटील – प्राचार्य आयटीआय मोरवाडी, मा.बोदडे – प्रशा.अधि.जनसंपर्क व माहिती विभाग हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-------

खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक : मा.सदगुरु कदम अनुमोदक : मा.विनय गायकवाड

शुक्रवार दिनांक ०९/०५/२०१४ रोजी सकाळी १०.३० वाजेपर्यंत सभा तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

मा.सभापती - शुक्रवार दिनांक ०९/०५/२०१४ रोजी सकाळी १०.३० वाजेपर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

( महेशदादा किसन लांडगे )
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.
मा.स्थायी समिती
कार्यपत्रिका क्रमांक - १११
सभावृत्तांत

( दिनांक २२/४/२०१४, २९/०४/२०१४ व ०६/०५/२०१४ ची तहकूब सभा )

दिनांक - ०९/०५/२०१४ वेळ - सकाळी १०.३० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची दिनांक ०६/०५/२०१४ ची तहकूब सभा शुक्रवार दिनांक ०९/०५/२०१४ रोजी सकाळी १०.३० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा. महेशदादा किसन लांडगे - सभापती
२. मा. कदम सदगुरु महादेव
३. मा. शेंडगे आशा सुखदेव
४. मा. ओव्हाळ रमा नितीन ऊर्फ सनी
५. मा. भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के.बापू
६. मा. सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग
७. मा. तरस बाळासाहेब जयवंत
८. मा. विनय ऊर्फ विनायक रमेश गायकवाड
९. मा. प्रसाद शेट्टी

या शिवाय मा.राजीव जाधव – आयुक्त, मा.झुरे - सह आयुक्त, मा.टेकाळे, मा.कुलकर्णी, मा.ढेरे, मा.गायकवाड, मा.फुंदे, मा.खांडकेकर, मा.दुरगुडे, मा.माछरे, – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.कांबळे - प्र.शहर अभियंता, मा.तुपे - सह शहर अभियंता, मा.भोसले - मुख्यलेखापाल, मा.भदाणे -उपसंचालक (नगररचना), मा.दुधेकर, मा.सवणे, मा.इंगळे, मा.काची, मा.चव्हाण, मा.शरद जाधव, मा.थोरात, मा.साळवी, मा.खाबडे, मा.पिरजादे, मा.दांगट, मा.जुंधारे, मा.गलबले, मा.केदारी, मा. संजय कांबळे – कार्य.अभियंता, मा.साळुंके - मुख्य उद्यान अधिक्षक, मा.बहुरे – प्रशासन अधिकारी, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

ठराव क्रमांक – ६७६० विषय क्रमांक – १
दिनांक – ०९/०५/२०१४ विभाग – मध्यवर्ती भांडार
सुचक – मा.सुनिता गवळी अनुमोदक – मा.शांताराम भालेकर
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मभां/०४/कावि/१९५/२०१४ दि. १०/०४/२०१४.

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन –

मनपाचे स्थानिक संस्था कर विभागाकडील आवश्यक मागणीनुसार मे.अमृत मुद्रणालय, चिंचवड यांचेकडुन ३,२०० नग एस्कॉर्ट पावती पुस्तके छपाईकामी र.रु. १,५८,४००/- (अक्षरी र.रू.एक लाख अठ्ठावन्न हजार चारशे) चे खर्चास मान्यता मिळणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस तसेच स्थानिक संस्था कर विभागासाठी एस्कॉर्ट पावती पुस्तके ( दर प्रती नग र.रु.४९.५०) प्राप्त मंजूर लघुत्तम दराने मे.अमृत मुद्रणालय यांचेकडून करारनाम्याची मुदत संपेपर्यंत व नाक्यावरील एस्कॉर्ट पावती बंद होईपर्यंत छपाई करुन घेण्यास व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. ठराव कायम होणेची वाट न पाहता पुढील कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६७६१ विषय क्रमांक – २
दिनांक – ०९/०५/२०१४ विभाग – मध्यवर्ती भांडार विभाग
सुचक – मा.सुनिता गवळी अनुमोदक – मा.शांताराम भालेकर

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मभां/०४/कावि/१९६/२०१४ दि. १०/०४/२०१४.

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन –

मनपाचे क्रीडा विभागाकडील आवश्यक मागणीनुसार मे.अमृत मुद्रणालय, चिंचवड यांचेकडुन ५,००० नग प्रवेश तिकीटे छपाई कामी र.रु.१,०५,०००/- (अक्षरी र.रू. एक लाख पाच हजार) चे खर्चास मान्यता मिळणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस तसेच क्रीडा विभागाकडील जलतरण तलाव प्रवेश तिकीटे व उद्यान विभागाकडील सर्व उद्यानांची प्रवेश तिकीटे निविदेतील प्राप्त लघुत्तम मंजूर दराने मे.अमृत मुद्रणालय यांचेकडून करारनाम्याची मुदत संपेपर्यंत छपाई करुन घेण्यास व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देणेत येत आहे. ठराव कायम होणेची वाट न पाहता पुढील कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६७६२ विषय क्रमांक – ३
दिनांक – ०९/०५/२०१४ विभाग – स्थापत्य
सुचक – मा.सुनिता गवळी अनुमोदक – मा.बाळासाहेब तरस

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/लेखा/१/कावि/५२९/२०१४ दि. १५/०४/२०१४.

विषय – मुंबई पुणे रस्ता पिंपरी चौक ते भक्ती शक्ती चौक निगडी कर्बस्टोन, फुटपाथ, रस्ता दुभाजक इ. देखभाल व दुरुस्ती करणे.

विषय क्रमांक ३ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६७६३ विषय क्रमांक – ४
दिनांक – ०९/०५/२०१४ विभाग – प्रशासन
सुचक – मा.विनय गायकवाड अनुमोदक – मा.प्रसाद शेट्टी

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/११/कावि/१७४/२०१४ दि. ११/०४/२०१४.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

डॉ.गाडेकर योगेश अ., वैद्यकीय अधिकारी, वाय.सी.एम.एच रुग्णालय यांना PGM-CET 2014

पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी पाठविणेबाबत मान्यता देणेसाठी, तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील प्रकरण ५ नियम ६३ नुसार सदर अभ्यासक्रमाकरीता ०२ वर्ष असाधारण रजा व प्रकरण ३ नियम.१६ मधील अखंडीत रजेतील ०१ वर्ष अशी एकूण ०३ वर्षाची रजा कोणत्याही प्रकारचे अर्थिक फायदे (मासिक वेतन, भत्ते, रजा वेतन इ.) न देता सेवा अखंडीत ठेवून मंजूर करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( महेशदादा किसन लांडगे )
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/४/कावि/४११/२०१४
दिनांक - १३/०५/२०१४



नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना